महा मेट्रो

PUNE METRO

पुणे मेट्रोच्या फेसबुक पेजला ५ लाख लोकांची पसंती




पुणे , २२.१२.२०१९ : पुणे मेट्रो जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचण्यासाठी विविध समाज माध्यमांचा वापर करीत आली आहे. लोकांना पुणे मेट्रोची अद्ययावत माहिती देण्यात आणि लोकांकडून सूचना , मेट्रो कामासंबधी विविध उपाय योजना, तक्रारी आणि इतर बाबी समजून घेण्यासाठी पुणे मेट्रोने फेसबुक , ट्विटर , इंस्टाग्राम, ब्लॉग आणि पुणे मेट्रो चीं वेबसाईट या समाज माध्यमांद्वारे मोठ्या प्रमाणावर लोकांशी संपर्क साधला आहे. पुणे मेट्रोच्या समाज

माध्यमांना  लोकांचा  उस्फुर्त  प्रतिसाद  मिळत आहे. नुकतेच  पुणे मेट्रोच्या फेसबुक पेज ला ५ लाख  लोकांची  पसंती (Likes) मिळाली आहे. पुणे मेट्रो नियमितपणे पुणे मेट्रोच्या कामाची प्रगती , मेट्रोला लगणार्या जागा सम्बन्धी माहीती, मेट्रो कामामुळे होणाऱ्या  वाहतूकीत  होणारे बदल,  मेट्रोचे नवीन ठिकाणी सुरु होणारे काम  इत्यादी अनेक माहिती लोकांपर्यंत पोहचण्यासाठी
विविध  समाजमाध्यमांचा उपयोग करीत आहे. मेट्रो भविष्यात कशी दिसणार आहे , मेट्रोचे स्थानके  कशी असणार  आहे. मेट्रोचा  भूमिगत  मार्ग  कसा असणार आहे, मेट्रोच्या भूमिगत मार्गासाठी आणलेल्या टनेल बोरिंग  मशीन  कसे काम करते ,  मेट्रोची स्थानके कुठे असणार  आहे , मेट्रो स्थानकांचे एन्ट्री एक्सिट कुठल्या ठिकाणी नियोजत  केले आहे,   पुणे मेट्रोच्या स्थनाकांचे  आराखडे  व था संबंधीच्या विविध व्हिडिओ क्लिप मेट्रो  वेळोवेळी समाजमाध्यमाद्वारे  प्रकाशित करत आली आहे. त्यामुळे पुणेकरांना मेट्रोची अद्ययावत स्थिती  मिळत आहे. पुणे मेट्रोला समाजमाध्यमांद्वारे  अनेक महत्वाच्या सूचना मिळाल्या आहेत . त्यामुळे  मेट्रोचे काम  अधिक   समर्थपणे  चालू ठेवण्यात यश आले आहे. पुणे मेट्रो फेसबुक पेजला  ३ वर्षांपेक्षा कमी वेळात ५ लाखापेक्षा जास्त लोकांची पसंती मिळाली आहे. भारतातल्या सर्व  मेट्रोच्या तुलनेत पुणे मेट्रो फेसबुकला दुसऱ्या नंबरची पसंती मिळाली आहे. पुणे मेट्रोचे फेसबुक पेज ५ डिसेंबर  २०१६ रोजी सुरु करण्यात आले व केवळ ४ महिन्यांमध्ये १६ मार्च २०१६ रोजी त्याने १ लाखांचा टप्पा पार पाडला. त्यानंतर २७ ऑक्टोबर २०१७ रोजी २ लाखांचा  टप्पा पार पाडला. तदनंतर १० एप्रिल २०१८ ला ३ लाख लोकांच्या पसंतीला हे फेसबुक पेज उतरले आहे . तदनंतर  ४ लाख व आजच्या ५ लाख  लोकांच्या  पसंतीला हे फेसबुक पेज उतरले आहे.
  याप्रसंगी महामेट्रोच्या व्यवस्थापकीय  संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी पुणेकरांचे आभार मानले असून म्हटले आहे की  पुणेकरांच्या सहाकार्यामुळे , बहुमूल्य  सूचनांमुळे हा प्रकल्प  पूर्णत्वास नेण्याकड़े महत्वाचा  सहयोग लाभला आहें.